26/10/18

# University of Mumbai

**No. Aff./ICC/ (2018-19)/43/ of 2018**

परिपत्रक:

विषय:— मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/ परिसंस्था मध्ये विद्यार्थीनी/ महिला अध्यापक/ कर्मचारी यांच्या हक्काबाबत.

संदर्भ:— उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे क्र. बैठक—२०१८/प्र. क्र. १३२/१८/विशी—१ दिनांक १९—०९—२०१८ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीने मुंबई विद्यापीठ येथे दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक ०७ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची बैठक आयोजित केली होती. सदरहू बैठकीमध्ये मुंबई विद्यापीठामध्ये शिकणा—या विद्यार्थीनी व विद्यापीठामध्ये काम करणा—या महिला अध्यापक व कर्मचारी यांच्या कामाच्या ठिकाणी होणा—या लैगिंक छळाच्याबाबत घडलेल्या घटनांच्या अनुषंगाने चर्चा झाली. व त्यानुसार खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. स्त्रीयांना कामाच्या ठिकाणी होणा—या लैगिंक छळाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने विशाखा मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत. त्यानुसार सर्व अकृषी विद्यापीठे व शैक्षणिक महाविद्यालये/ परिसंस्थांमध्ये विशाखा समित्या स्थापन करणे बंधनकारक आहे. त्यानुसार मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांमध्ये विशाखा समिती स्थापन झाल्या असतीलच, ज्याठिकाणी अशा समित्या अस्तित्वात नसतील तेथे तातडीने विशाखा समिती स्थापन कराव्यात. व विशाखा मार्गदर्शक सूचनांनुसार तंतोतंत कार्यवाही होईल हे पहावे. सदर समित्या स्थापन झाल्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.
२. महिलांच्या हक्कांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांच्या प्रशासनाने दक्षता घ्यावी.
३. मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील महिलांच्या लैंगिक, शारीरिक छळा संदर्भात जागृतता निर्माण करण्यासाठी कोणता गुन्हा केल्यावर काय शिक्षा होउ शकते किंवा यानुषंगाने कृत्य केल्यावर कायद्यामध्ये कोणत्या प्रकारच्या शिक्षेच्या तरतूदी आहेत, याबाबत महाविद्यालंयानी दर्शनी भागात माहिती वजा सूचना कायमस्वरूपी लावाव्यात. यासंदर्भात कायद्यातील कलमे व शिक्षेच्या तरतूदींचा समावेश असावा, जेणेकरून ते वाचून वाईट वृत्तीचे लोकांच्या मनात धाक निर्माण होईल.
४. विद्यापीठे, शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांमधील महिलांना त्यांच्यावरील अन्याया विरोधात सहजपणे तक्रार करणे शक्य व्हावे. यासाठी शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांमधील योग्य ठिकाणी सखी बॉक्स बसविणे बंधनकारक आहे.

PC 5 D:/Regular-17/roshan new shelar/Circular (Pra)

त्याअनुषंगाने विद्यापीठाचे परिपत्रक क्र. **Aff./ICC/ (2018-19)/ 36 / of 2018** दिनांक २४ सप्टेंबर, २०१८ अन्वये सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

५. राज्यातील कोणत्याही शैक्षणिक संस्थेतील महिलांच्या तक्रारी संबंधित प्रशासनाने दुर्लक्ष करू नये यासाठी राज्यातील शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांमधील महिलांच्याकडून प्राप्त होणा—या तक्रारीबाबतचा तपशिल प्रत्येक ६ महिन्याला पाठविण्याबाबत राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालये यांना बंधनकारक करण्यात यावे.

६. महिलांना त्यांच्या हक्कांविषयी जागृती व्हावी यासाठी तसेच इतर कल्याणकारी योजना व सोयी—सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुंबई विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी त्यांच्या अर्थसंकल्पात सुमारे ५ टक्के निधी वेगळा राखून ठेवावा.

त्याअनुषंगाने संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना सुचित करण्यात येत आहे की, उपरोक्त नमूद केलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

25.10.18

(प्रो. सुनिल भिरूड)
प्र—कुलसचिव

मुंबई—४०० ०३२
25 ऑक्टेबर, २०१८

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक